# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
## शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी २०२५

**ठळक बातम्या**

1. **देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावं असंराष्ट्रपतींचं आवाहन.**
2. **देशाचा वास्तविक जीडीपी वृद्धीदर चालू आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा आर्थिक पाहणी अहवालाचा अंदाज.**
3. **'जीबीएस'बाबत नागपूर मनपाचा सतर्कतेचा इशारा, शहरातील सर्व रुग्णालयांना दिशानिर्देश जारी.**
4. **३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला २५ पदकांची कमाई.**

### राष्ट्रपती अभिभाषण

देशाचा विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी आपलं सरकार अभूतपूर्व वेगानं काम करत असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. संसदेच्या आजपासून सुरू झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्या संसदेला संबोधित करत होत्या. देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांच्यासारख्या थोर नेत्यांनी दिलेली एकतेची शपथ आठवून आणि देश संरक्षणात प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांकडून प्रेरणा घेऊन सर्व नागरिकांनी योगदान द्यावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करत होत्या.सरकारनं गेल्या १० वर्षात विकास आणि प्रगतीची नवी शिखरं गाठली आहेत, असं त्या म्हणाल्या. शेतकरी, युवक आणि गरिबांच्या हिताला सरकारनं नेहमीच प्राधान्य दिलं असून मध्यमवर्गीयांची स्वप्न साकार करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. तंत्रज्ञानचा अंगिकार करण्यात भारत जगाचा मार्गदर्शक बनला आहे. देशाच्या युपीआय तंत्रज्ञानाच्या यशाचं जगभरात कौतुक होत आहे, असं त्या म्हणाल्या आयुष्यमान भारत आणि मुद्रा लोन बद्दल त्यांनी सांगितल की ....

***इन्हें हर वर्ष पाच लाख रुपये का हेल्थ कवर मिलेगा। छोटे उद्यमियों के लिए मुद्रा ऋण की सीमा दस लाख रुपये से बढ़कर बीस लाख रुपये कर दी गई।***

देशाची अंतराळ विज्ञानातली प्रगती उल्लेखनीय असून लवकरच भारतीय अंतराळवीर गगनयानातून अंतराळात जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकारनं 'इंडिया ए आय' हा कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला चालना देणारा नवा कार्यक्रम सुरु केला असल्याचं त्यांनी सांगितलं. भारत जैव उत्पादन क्षेत्रात भविष्यातल्या औद्योगिक क्रांतीचा सूत्रधार असेल, असंही त्या म्हणाल्या. सरकारनं डिजिटल तंत्रज्ञानाला समानता आणि सामाजिक न्यायाचं नवं माध्यम बनवलं आहे असं त्या म्हणाल्या. यातूनच छोट्या गावांपर्यंत बँकिंग

आणि युपीआय सारख्या जागतिक दर्जाच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. ई-प्रशासन हे देखील सरकारचं प्राधान्य क्षेत्र असल्याचं त्यांनी सांगितलं. महिलांच्या नेतृत्वाखालच्या विकासाला प्रोत्साहन दिलं जात असून महिला आज विविध क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत, असं राष्ट्रपती म्हणाल्या. आज महिला वैमानिक लढाऊ विमानं चालवत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख राष्ट्रपतींनी केला. महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवल्या जात असून ३ लाख महिलांना लखपतीदीदी बनवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं त्यांनी सांगितलं. देशात पायाभूत सुविधा विकास जलद गतीनं सुरु असून त्यासाठी रस्ते बांधणी, रेल्वे मार्ग निर्मिती,मेट्रो अशी विविध कामं सुरु असल्याचं त्या म्हणाल्या. देशात गेल्या ६ महिन्यात १७ नव्या वंदे भारत रेल्वे सुरु झाल्या तर काश्मीर मध्ये जगातला सर्वात उंच रेल्वेपूल बांधल्याच त्यांनी सांगितलं. देशातल्या विमानतळांची संख्या गेल्या १० वर्षात दुप्पट झाल्याचं त्यांनी सांगितलं.

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड

महिलांच्या योगदानाशिवाय देश समृद्ध होऊ शकत नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनादिना निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. देशात प्रथमच लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना एक तृतीयांश आरक्षण देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.देशातल्या महिला अनेक आव्हानांना सामोऱ्या जात असून त्या युद्ध करण्यासाठी सुरक्षा दलात देखील सहभागी होत आहेत, असं त्यांनी सांगितलं.कामाच्या ठिकाणी आणि इतर जागी महिलांबाबत होत असलेला भेदभाव कमी करण्यासाठी महिला आयोगानं काम करावं, असं ते म्हणाले.

## आर्थिक पाहणी अहवाल

देशाचा वास्तविक जीडीपी वृद्धी दर चालू आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज २०२४-२५ या वर्षातल्या आर्थिक पाहणीचा अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे सादर केला. कृषी आणि सेवा क्षेत्राच्या पाठबळावर देशाची अर्थव्यवस्था सातत्यपूर्ण प्रगती करत असून खरिपात चांगला पाऊस झाल्यानं ग्रामीण भागातल्या मागणीत वाढ होत आहे. कारखाना क्षेत्राला मात्र देशाबाहेरुन मागणी घसरल्याचा फटका बसला आहे. वैयक्तिक उपभोगाचं प्रमाण स्थिर राहिलं,आर्थिक शिस्त आणि सेवा पुरवठ्यात वाढ या मजबूत बाबींमुळे स्थूल रुपाने आर्थिक स्थैर्य मिळालं. असं अहवालात नमूद केलं आहे. २०११-१२ मधे स्थिर केलेल्या निकषांवर आधारित चलन फुगवट्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ६ पूर्णांक ७ दशांश टक्के तर पूर्ण वर्षभरात ५ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ झाली. चालू आर्थिक वर्षाच्या पूर्वार्धात जीडीपी वाढीचा दर ६ टक्के राहिला असं अहवालात म्हटलं आहे. तत्पूर्वी, उद्या सादर होणाऱ्या बजेट बद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशावाद व्यक्त केला....

***मैं विश्वास से कह सकता हूँ कि 2047 जब आजादी के सौ साल होंगे। विकसित भारत का जो संकल्प देश ने लिया है, यह बजट एक नया विश्वास पैदा करेगा।***

शेअर बाजार

अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारात आजही मोठी तेजी होते आहे. सध्या सेन्सेक्स सुमारे ६०० अंकांनी वधारुन ७७ हजार ३५० अंकांच्या वर व्यवहार करतो आहे. निफ्टीमध्ये २०० हून अधिक अंकांची वाढ झाली असून हा निर्देशांक २३ हजार ४०० अंकांच्या वर आहे.

जीबीएस

पुणे शहरात गुलियन बॅरी सिंड्रोमचे रुग्ण आढळून आल्यानंतर नागपूर शहरात देखील सतर्कतेच्या दृष्टीन नागपूर महानगरपालिकेद्वारे उपाययोजना करण्यात येत आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार शहरातील सर्व रुग्णालयांसाठी दिशानिर्देश जारी करण्यात आलेले आहेत.पुणे शहरात गुलियन बॅरी सिंड्रोमचे (जीबीएस) रुग्ण झपाट्याने वाढत असल्याने राज्यभरातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. यासंदर्भात  नागपूर महानगरपालिकेद्वारे सर्व रुग्णालयांना संशयीत आणि बाधित रुग्णांची योग्य नोंद घेउन ती माहिती मनपा आरोग्य विभागाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी सांगितले.जीबीएस हा आजार नवा नाही. उपचारानंतर त्यातून रुग्ण पूर्णपणे बरा होतो, पण काहींना दीर्घकाळ त्रास जाणवू शकतो. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी. चालण्यास त्रास, अशक्तपणा, हातापायांना मुंग्या येणे, हातापायांची ताकद कमी होणे, डायरिया, बोलण्यास किंवा अन्न गिळण्यास त्रास होणे यासह इतर काही लक्षणे आढळून आल्यास नागरिकांनी घाबरून न जाता डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. शासनाच्या आदेशानुसार सध्या सर्व आरोग्य केंद्रांमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. खासगी रुग्णालयांना अशा प्रकारचे रुग्ण आढळून आल्यास नागपूर महानगरपालिकेला माहिती देण्याची सूचना, डॉ.दीपक सेलोकर यांनी केली आहे.

प्रमोद सावंत

ज्याप्रमाणे वैद्यकीय अभियांत्रिकी  उच्च शिक्षणाकरिता उच्चस्तरावर परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर समाजकार्य प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी सोशल वर्क एज्युकेशन कौन्सिलची गरज असल्याचं प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज नागपूर मध्ये केलं. नागपुरातील वनामती सभागृहात आयोजित महाराष्ट्र सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) या संघटनेला 30 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आणि प्रजासत्ताक भारताच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून रिपब्लिक इंडिया 75 अँड बीओंड या विषयावर दोन दिवसीय बहू विद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी आज ते बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेमध्ये समाजकार्य शिक्षणावर विविध तज्ज्ञाद्वारे विचार मंथन होणार

आहे. यावेळेला मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूलकर, सामाजिक न्याय विभागाचे माजी प्रधान सचिव आर.डी.शिंदे यांचा सत्कार करण्यात आला तसेच विविध विद्यापीठातून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

## मुख्य सचिव

महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक  यांनी आज मेट्रो भवनला भेट देत महा मेट्रो द्वारे कार्यरत नागपूर, पुणे, ठाणे मेट्रो रेल प्रकल्पाचा आढावा घेतला. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी महा मेट्रोच्या वतीन त्यांना मेट्रोच्या संपूर्ण कार्याची आणि प्रगतीची माहिती प्रदान केली. आढावा बैठकी दरम्यान सौनिक यांनी महा मेट्रोशी संबंधित मंत्रालय स्तरावरील प्रलंबित समस्या जाणून घेतल्या आणि त्वरित मार्गी लावण्याची ग्वाही दिली. यासोबतच फर्स्ट अँड लास्ट माईल कनेटिव्हिटी अंतर्गत नागपूर महानगरपालिका सोबत योग्यरित्या नियोजन करून मल्टीमॉडेल इंटिग्रेशन करण्याच्या सूचना दिल्या जेणेकरून नागरिकांना सहज रित्या परिवहनाचे साधन उपलब्ध होऊ शकेल आणि  नागरिक स्वतःच्या  वाहना ऐवजी सार्वजनिक परिवहनाचे साधन जास्तीत जास्ती वापरतील. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून पैसे वाचविण्यास मदत आणि  सोबतच या निमित्तान पर्यावरण राखण्यास देखील मदत होईल. तसेच मुख्य सचिव यांनी मेट्रो स्टेशन येथे उपलब्ध व्यवसायिक जागेवर स्थानिक कला तसेच खाद्य पदार्थ यांना कश्या प्रकारे पुढे आणता येईल आणि  प्रेरित करता येईल या करता उपाय योजना कराव्या असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

उत्तराखंड इथे सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रान आतापर्यंत सर्वाधिक २५ पदकांची कमाई केली आहे. यात ५ सुवर्ण, १२ रौप्य आणि ८ कास्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र पदक तालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आज झालेल्या स्पर्धांमध्ये १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात पुरुष गटात महाराष्ट्राच्या पार्थ माने यान सुवर्ण पदक मिळवलं आहे. तर, रौप्य पदकही महाराष्ट्राच्या रुद्रांक्ष पाटील यान मिळवलं आहे. सेना दलाच्या अंकुश जाधव यान या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं. काल झालेल्या १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत महिलांच्या गटात महाराष्ट्राच्या आर्या बोरसे हिन रौप्य पदक पटकावलं.

## विश्व मराठी संमेलन

मराठी भाषेला राजमान्यता देण्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. याच मराठी भाषेची परंपरा टिकवण्यासाठी आपण या संमेलनाच्या माध्यमातून साद घालत आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुणे इथे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

*****